# प्रकरण 2 रे

## मराठी ग्रामीण कवितेचा प्रवाह

### ग्रामीण साहित्याची संकल्पना.

मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याची निर्मिती सर्वसाधारणतः 1925 पासून सुरू होऊ लागली. खरे तर ग्रामीण साहित्याच्या खुणा त्याच्या आधीच्या कालखंडात सापडणार नाहीत असे नाही पण सर्वसाधारणपणे गांधीच्या काळात महात्मा गांधीनी स्वातंत्र्याच्या प्रेरणेने खेडयातला माणूस केंद्रस्थानी मानला . सामान्य माणसाला चळवळीत केंद्रस्थानी ठेवण्याची दृष्टी गांधीजींची होती. भारत हा 80% खेडयाचा देश आहे. त्यामुळे स्वातंत्र्याच्या चळवळीत खेडयातला सामान्य माणूस केंद्रस्थानी असला पाहिजे या भूमिकेने गांधीजीनी खेडयाकडे चला अशी हाक दिली. गांधीजी हे त्या काळातले लोकप्रिय आणि सर्वमान्य नेतृत्व होते. सहाजिकच समाजातील सर्व थरातील लोकावर त्यांचा प्रभाव होता. खेडयाकडे चला या संदेशाचा परिणाम सहाजिकच त्या काळातील साहित्यावरही झाला आणि मूळचे खेडयातील, पण शहरात येऊन राहिलेले साहित्यिक खेडयाकडे वळले आणि त्यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण करावयास सुरूवात केली. म. गांधीजींच्या मुळेच साहित्यात देशी नायक आला आणि ग्रामीण साहित्याची निर्मितीही मोठया प्रमाणावर होऊ लागली. म्हणून 1925 पासून ग्रामीण अशा सदरात मोडली जाणारी साहित्याची निर्मिती होऊ लागली असे म्हटले जाते त्यांच्या गुणवैशिष्टयाचा शोध या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

खरे तर यापूर्वीही ग्रामीण जीवनाचे चित्रण साहित्यात होत होते. परंतु नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात. त्याप्रमाणे 'ग्रामीण साहित्याचा शोध महानुभाव गद्यापर्यंत नेता येतो' [1] परंतु त्या काळात ग्रामीण जीवनाचे दर्शन हे अनुषंगिक अशा स्वरूपाचे होते. खास अशा स्वरूपाचे किंवा जाणीवपूर्वक अशा स्वरूपाची ग्रामीण साहित्याची निर्मिती होत नव्हती. ग्रामीण जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होऊ लागला. परंतु

ग्रामीण साहित्याचा विचार करीत असताना ग्रामीण साहित्य म्हणजे नेमके काय ? असा एक प्रश्न ओघानेच निर्माण होतो. बऱ्याचदा साहित्यात निरनिराळया प्रकारच्या विचारप्रणाली येत असतात. म्हणून त्या त्या काळात त्या प्रणालीच्या अनुषंगाने साहित्याला विशेषणे लावली जातात. मात्र ग्रामीण साहित्याच्या संदर्भात विचार करत असताना असे लक्षात येते की ग्रामीण साहित्याचे एकूण स्वरूपच वेगळे आहे.

ग्रामीण साहित्या म्हणजे वास्तव ग्रामीण जीवनाचे कलात्मक पातळीवर घडवलेले दर्शन असे म्हणता येईल. ग्रामीण जीवनाचे स्वरूप म्हणजे संस्कृती, लोकांचे व्यवसाय, राहणीमान, भौगोलिकता, रितीरिवाज, संकेत, ग्रामीणजीवनातील व्यक्तीची नाती, संबंध, तेथील भाषा, या सगळया गोष्टी शहरी जीवनापेक्षा कमालीच्या भिन्न आहेत शिवाय ग्रामीण संस्कृती ही प्राधान्याने कृषीसंस्कृती आहे. शेती हाच प्रमुखव्यवसाय असल्यामुळे प्राणीजीवनाशी संबंध येतो. त्यामुळे गाई, बैलासारख्या प्राण्यानाही ग्रामीण जीवनात महत्वपूर्ण स्थान असते. हे ग्रामीण जीवन म्हणूनच शहरी जीवनापेक्षा वेगळे आहे. भारतात 80% लोक ग्रामीण जीवन जगतात म्हणजे 80% लोकांचा संबंध कृषी संस्कृतीशी आहे. त्यामुळे ग्रामीण लोकांचे प्रश्न त्यांच्या समस्या हया शहरी जीवनापेक्षा भिन्न आहेत.

ग्रामीण साहित्यालाच कधीकधी अभ्यासक प्रादेशिक साहित्य मानतात.[2] कारण प्रादेशिक साहित्य म्हणून जे जीवन चित्रण काही वेळा केलेले आहे ते खरे तर ग्रामविषयकच आहे. परंतु प्रादेशिकतेची ग्रामीणत्वाशी काही बाबतीत साम्य असले तरी या संज्ञा एकच आहेत असे म्हणता येणार नाही . तसेच या दोन संज्ञानी निर्देशित होणारा अर्थ सारखा असतोच असे नाही. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात ' प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला ग्रामसंस्कृतीला फारसे महत्व देत नाही तर ते महत्व देते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला. कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा भाग म्हणून . ग्रामसंस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्वाचा असतो. त्या दृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्ति केंद्रितता दिसत नाही तर समूह केंद्रिकता हे त्या साहित्याचे वैशिष्टय आहे. या साहित्यातून एखादी व्यक्ती प्रमुख असली तरी तिच्यातून ध्वनीत होत असतो तो संपूर्ण प्रदेश.[3]

12222
A

म्हणून ग्रामीण म्हणजे नेमके काय? हा प्रश्न निर्माण होतो. ग्रामीण जीवनातून आकाराला येणारे किंवा ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य असे थोडक्यात म्हटले तरी ग्रामीण जीवन व ग्रामीण जीवनाचे स्वरुप पहाणे आवश्यक ठरते.

देशात सर्वत्र पसरलेल्या खेडयापाडयातील समाजाला त्यांचा व्यवसाय, शेती, रीतीरीवाज यामुळे स्वतःची अशी एक संस्कृती आहे. तर पुर्वीपासून आपल्या देशात ग्राम आणि नगरी असा भेद आहे. नगरे ही सुसंस्कृत, समृद्ध आणि वेगवेगळया उद्योगांनी गजबजलेले असतात. प्राचीन काळातील नगराचे स्वरुपही प्रचंड व्यवहारांनी भरलेले आहे. त्यात खरेपणा, दांभिकता आहे. तसेच ती समृद्धीची केंद्रे बनलेली आहेत. खेडयाचे मात्र तसे नाही. खेडयाची रचना आणि संस्कृती भिन्न असल्यामुळे तिथला मानवी स्वभावही वेगळा आहे. शेतकरी हा ग्रामरचनेतले केंद्र असून इतर त्याच्याभोवती केंद्रवर्ती झाले आहे. त्यामध्ये सुतार, लोहार यासारखे कारागीर लोक शेतकऱ्याला अवजारे पुरवितात. तर इतर जातीतील बलुतेदार त्याला वेगवेगळया प्रकारची मदत करतात. त्यामुळे शेतीच्या उत्पन्नावर शेतकऱ्याप्रमाणे काही अंशी त्याचाही हक्क असतो, शिवाय घिसाडी, कोल्हाटयासारखी फिरस्ते . गावच्या काही गरजाही भागवतात. त्यांना अलुते-बलुते असे म्हटले जात असते. म्हणजे ग्रामीण संस्कृती प्राचीन काळापासून होती. आता जरी खेडयापाडयापासून बदलाला प्रारंभ झाला असला तरी किंवा कितीही परिवर्तन झाले तरी कृषिकेंद्रित रचनाही, कृषिजीवन आणि शेतकरी हा ग्रामीण संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे.

ग्रामीण संस्कृतीसंबंधी विचार करीत असताना कुटुंबव्यवस्था आणि जातीरचना ही महत्वाची ठरते. कृषि संस्कृतीचे एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे एकत्र कुटुंबव्यवस्थेचा विचार करता येईल. माणूसबळ शेतीसाठी आवश्यक असते. म्हणून मोठी कुटुंबे असणे आवश्यक आहे. स्वाभाविकच स्त्रीला महत्वाचे स्थान प्राप्त होते. म्हणजे ग्रामीण समाजरचनेतला माणूस नात्यागोत्यातल्याशिवाय वेगळा राहूच शकत नाही. आज खेडयापाडयातून परिवर्तनामुळे विभक्त अशी छोटी छोटी कुटुंबे आकाराला येवू लागली आहेत. तरी एकत्र कुटुंबपद्धती ग्रामजीवनात वेगळेपणाने उठून दिसते. जातीरचना आजही ग्रामीण भागात दृष्टीस पडते. परिवर्तन घडूनही तिचे अस्तित्व नष्ट झालेले नाही. शिक्षणाचे लोण खेडयापाडयात पोहोचले तरी अजूनही जातीव्यवस्था आहे. प्रत्येक जातीची वेगळी अशी संस्कृती आहे. शिवाय या सगळया लोकांचा संबंध गावगाडयाशी असतो. म्हणजे कुटूंबपरंपरा, जातीची परंपरा

आणि गावगाडयाची रचना या सगळयामधून ग्रामजीवनात घडणारी मानसिकता ही वेगळी अशी आहे. तसेच हे सगळे लोक आणि गावगाडा कृषि संस्कृतीतून आलेले आहे. म्हणजे निसर्गसन्मुख एक आहे. जत्राखेत्रा, विविध उत्सव या सगळयातून ही ग्रामसंस्कृतीचे वेगळेपण दिसते. म्हणजे ग्रामीण संस्कृतीची आणि त्या संस्कृतीतून घडलेल्या माणसांच्या मनोविश्वाचे आणि जीवनव्यवहाराचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य असे म्हणता येईल.

ग्रामीण संस्कृतीसह ग्रामीण जीवनाचा कलात्मक पातळीवर होणारा अविष्कार म्हणजे ग्रामीण साहित्य होय अशी माझी भूमिका आहे.

**ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा**

मराठीतील ग्रामीण साहित्याला 1945 नंतर बहर आलेला दिसतो. याच्याही अगोदर हरिभाऊ आपटे यांच्या कथा व कादंब-यांमध्ये ग्रामीणतेच्या खाणाखुणा पहावयास मिळतात. हरिभाऊंची 'काळ तर मोठा कठिण आला' ही कथा उध्वस्त होत असलेल्या ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकते.[4] तसेच महात्मा फुले यांनीही ग्रामीण व अज्ञानी समाजाला गांजविणाऱ्या सामाजिक प्रवृत्तीचा निषेध करीतच ग्रामीण समाजाच्या उन्नतीचे जाणीवपूर्वक प्रयत्न करताना या समाजाची अस्मिता म्हणजेच ग्रामीण जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण हे त्याचे प्रभावी साधन मानून ग्रामीण समाजात शैक्षणिक जागृती करण्याविषयीची जी शिक्षण पद्धती मांडली आहे ती या संपूर्ण देशाला व्यापून टाकणारी आहे. त्यामुळे ग्रामीण समाजातील सधन वर्ग का होईना शिक्षणाकडे आकृष्ट झाला. परिणामी अन्य विचारवंतानाही ग्रामीण समाजजीवनाचे चित्र कोठे ना कोठे व्हावयास पाहिजे असे वाटू लागले. व तो प्रयत्न हरिभाऊ आपटे यांनी वरील कथेमध्ये केला आहे. त्यांची 'काळ तर मोठा कठिण आला' ही कथा पहिली ग्रामीण कथा मानली जाते. मात्र त्या काळात ग्रामीण वाङ्मय किंवा प्रादेशिक वाङ्मय ही संज्ञा रुढ झालेली नव्हती. डॉ. आनंद यादव मात्र प्रादेशिक आणि ग्रामीण वाङ्मय असा भेद मानतात.[5] किंबहुना "प्रादेशिक वाङ्मय म्हणजे एखाद्या प्रदेशातील लोकजीवन, तेथील संस्कृती, त्या प्रदेशाशी निगडीत असल्याने त्या संदर्भात निर्माण झालेल्या काही समस्या, काही जीवन संकेत व रीती यांचे तेथील लोकांच्या समूहाचे ज्या वाङ्मयात चित्रण होते ते वाङ्मय म्हणजे प्रादेशिक वाङ्मय होय. त्या प्रदेशाचे जीवन चित्रण अपेक्षित असल्याने स्वाभाविकच लोकसमूहाचे चित्रण त्यात अटळ होऊन बसते. ते काहीसे प्रातिनिधीक असावे अशी अपेक्षा रहाते.[6]

प्रादेशिक वाङ्‌मयात त्या त्या प्रदेशातील शहरी जीवन न येण्याची अपेक्षा असते. प्रादेशिक असा शब्दप्रयोग त्या प्रदेशातील सर्व काही असा अर्थ निघत असला तरी वाङ्‌मयाच्या संदर्भात प्रादेशिक हा शब्द वापरताना त्या प्रदेशातील ग्रामीण लोकजीवनच अभिप्रेत असते. या अर्थाने प्रादेशिक वाङ्‌मय म्हणजे ग्रामीण वाङ्‌मयच असते. असे डॉ.आनंद यादव यांना वाटते. मात्र ग्रामीण वाङ्‌मय असा शब्दप्रयोग करताना त्या वाङ्‌मयात समूहजीवन चित्रणाची अपेक्षा नसते. तर तेथील एखाद्या व्यक्तिचेही जीवन चित्रण चालते. 'बनगरवाडी'सारख्या एखाद्या ग्रामीण कादंबरीला तिच्यातल्या प्रादेशिक वैशिष्टयामुळे प्रादेशिकतेचे परिमाण ही लाभते. ग्रामीण वाङ्‌मयात एखादी व्यक्ती त्या समूहजीवनाचे प्रतिनिधित्व करू शकते म्हणून एखाद्या ग्रामीण लेखकाचे सर्व साहित्य एकत्र केले तर त्याचे स्वरुप प्रादेशिक होऊ शकते. असे डॉ.आनंद यादव यांना वाटते. पण ग्रामीण वाङ्‌मयात त्या त्या विभागातील व्यक्तिनिष्ठ जीवन अभिप्रेत असते. कित्येक वेळा ते व्यक्तिनिष्ठ जीवन प्रातिनिधीक ठरते. आणि ग्रामीण हा शब्द त्या प्रदेशातील शहरी वाङ्‌मयाला आपोआप व्याघात करणारा असल्यामुळे प्रादेशिक वाङ्‌मय असे न म्हणता ग्रामीण वाङ्‌मय असा शब्दप्रयोग करणे जास्त लोकप्रिय वाटते.[7]

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ग्रामीण वाङ्‌मय हरिभाऊच्या कथा कादंबऱ्याइतके जुने आहे. हरिभाऊची 'काळ तर मोठा बिकट आला होता' या कादंबरीचे उदाहरण देता येईल. हे वाङ्‌मय जरी मराठी वाङ्‌मयाच्या आधुनिकतेच्या काळात जन्माला आले असले तरी महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन आणि तिथल्या व्यक्ती हाच त्यांचा विषय दिसतो. मात्र त्या काळात प्रादेशिक वाङ्‌मय अगर ग्रामीण वाङ्‌मय वेगळया नावाने ओळखले जात नव्हते. आणि विपुल प्रमाणात त्याची निर्मिती नसल्यामुळे म्हणजेच स्वतंत्र वाङ्‌मय म्हणून त्याची निर्मिती विशिष्ट प्रेरणानी झालेली नसल्यामुळे ते वेगळे ग्रामीण वाङ्‌मय अशा संज्ञेने ओळखण्याची गरजही नव्हती. ग्रामीण जीवन हे वेगळे आहे. तिथली संस्कृती, रितीरिवाज, तिथल्या चालीरीती, तिथल्या रूढी, परंपरा, शहरी जीवनापेक्षा वेगळया आहेत. याची जाणीवही त्या काळात नव्हती. जमीनीतील अनेक समस्यांवर, अनेक प्रश्नांवर आणि वस्तुस्थितीवर भर देऊन हरिभाऊंच्या काळात साहित्यनिर्मिती होत होती. ग्रामीण जीवनाकडे हरिभाऊंचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा दिसत नाही. तरीही वस्तुस्थिती म्हणूनच दुष्काळात दुर्दशा झालेल्या शेतकऱ्याच्या जीवनाची व्यथा त्यांनी आपल्या कथेतून मांडली आहे. म्हणजे इतर सामाजिक प्रश्न असे हरिभाऊ आपल्या कथा कादंबऱ्यातून रेखाटत होते; तसेच कथेमध्ये दिसते-म्हणून ही कथा सर्वसाधारण वाङ्‌मयातच जमा होणे स्वाभाविक ठरते.

1920 नंतर मात्र परिस्थितीत बदल झालेला दिसतो. त्या काळात राजकीय परिस्थितीत झालेल्या बदलाचा परिणाम सामाजिक जीवन दृष्टीवरही झाला. लोकमान्य टिळकांच्यानंतर महात्मा गांधीकडे देशाचे नेतृत्व आलेले होते. गांधीजींची दृष्टी समग्र जीवन व्यापणारी होती. गांधीजींनी भारतातील खेडयाचे स्थान नव्या जाणीवेसह पटवून दिले. याचा परिणाम साहित्यावरही झाला. साहित्यिकाची दृष्टी खेडयाकडे वळली. तिथेच आपले खरे भारतीय जीवन आहे. तिथली अंधश्रद्धा नष्ट झाली पाहिजे. लोकांचा उद्धार आपण केला पाहिजे. द्रारिद्रय, अज्ञान नाहीसे करून लोकांच्या जीवनात बदल घडविला पाहिजे. समाजसुधारणा, समाजाचा उद्धार करायला खेडयात वाव आहे. तिथल्या लोकांना समानतेने वागविले पाहिजे या भूमिकेने ग्रामीण वाङ्मयाची निर्मिती होऊ लागली. वि.स.सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, ना.वि.कुलकर्णी, भा.वि.वरेरकर, रामतनय यांनी कथा कादंबऱ्यांची निर्मिती केली. वर सांगितलेल्या प्रेरणा त्यांच्या साहित्याच्या मुळाशी दिसतात. ग्रामीण जीवन निर्मळपणाने रेखाटावे अशी वास्तवदर्शी प्रेरणा 1925 ते 1940 या काळात दिसत नाही. उद्धाराची कल्पना मनाशी बाळगूनच साहित्यनिर्मिती केलेली दिसते. तर खेडयातील जीवन माणसांच्या भावभावना व विचारावर मध्यमवर्गीय कल्पनांचा आरोप करून रविकिरण मंडळ काळातील जानपद गीते या नावाने कवितेची निर्मिती केलेली दिसते. जानपद गीताच्या अगोदर मानवी वाङ्मयात (काव्यात) आधुनिक कविता होती. याच कालावधीमध्ये रविकिरण मंडळाची स्थापना 1920 नंतर झाली. रविकिरण मंडळातील कवीनी पूर्वपरंपरा विस्तार त्यांच्या शैलीतच धन्यता मानणे याचाही वापर आपल्या कवितामध्ये केला. व याचवेळी 'जानपद' कविता निर्माण होऊ लागली . यामध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण होऊ लागले, तिलाच ग्रामीण कविता समजत. प्रथम भा.रा.तांबे यांनी 'गुराख्याचे गाणे' लिहिले व जानपद काव्याला प्रारंभ झाला. परंतु यांच्याही अगोदर कवी गिरीशा यांनी 'भलरी' ही कविता जानपद भाषेत लिहिली होती. कवी यशवंत यांनी 'प्रेमाची दौलत' ही कविता लिहिली. याही अगोदर कवी चंद्रशेखर यांचा 'काय हो चमत्कार' आणि गिरीशाचे 'अंबराई' अशी शेतकरी जीवनावर दोन खंडकाव्ये प्रसिद्ध झालेली होती. आंबराई प्रसिद्ध झाल्यानंतरच्या चारपाच वर्षात अनेक कवीनी (ग्रामीण) जानपद कवितेला बहर आला . जानपदगीतामध्ये संपूर्ण ग्रामीण भाषा व ग्रामीण मनाचे स्पंदन पहावयास मिळते. यामध्ये रोजच्या ग्रामीण जीवनातील सामान्य प्रसंग, वर्णनपर माहिती, त्यातल्या त्यात शेतावरची पिके, निसर्ग, मोट, सुगी, पेरणी, काढणी, निंदणी, इर्जिक, पाऊस, सकाळ-संध्याकाळचे वर्णन, तरुण मुली,

गुराखी, तिथल्या माणसाच्या मनाचा निकोपपणा, इ. बाबी जानपद गीतामध्ये येतात. व ग्रामीण जीवनाच्या अनुभव क्षेत्राची वेगळेपणाची स्थूल ओळख या वाङ्‌मयाने करुन दिली.

1940-45 मध्ये मात्र अस्सल जीवनानुभवाचे दर्शन घडविणारी वास्तवदर्शी कथा श्री.म.माटे यांनी लिहिली. ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे ग्रामीण जीवन त्यांनी जवळून बघितल्यामुळे त्यांनी ते निर्भिडपणाने रेखाटले. म्हणजे ही प्रेरणा आतुन बाहेर आलेली परिणात्मक स्वरूपाची होती. म्हणून श्री.म.माटे यांची ग्रामीण कथा एक वेगळेच तेज घेऊन जन्माला आलेली दिसते. त्यांनी ग्रामीण जीवन अत्यंत वास्तवतेने रेखाटले आहे.[8]

त्यांच्याच काळात ग.ल.ठोकळ, र.वा.दिघे, यांनीही विपुल ग्रामीण साहित्य निर्मिती केली. त्यांच्यानुंतर फडक्याच्या वाङ्‌मयाचा विलक्षण प्रभाव असल्याने त्यांच्या वाङ्‌मयात अद्‌भुतता, काव्यमयता, मन भेदून टाकणारी निसर्ग वर्णने दिसतात. ठोकळांनी तर इंग्रजीतील ग्रामीण जीवन मराठीत आणले. त्यामुळे इथले ग्रामीण जीवन बाजूला पडले. मनोरंजनासाठी नवा बदल हेच त्यांच्या वाङ्‌मयामागे प्रेरणा दिसते. थोडक्यात असे म्हणतात येईल की ठोकळ, दिघे यांचे ग्रामीण वाङ्‌मय वाङ्‌मयीन भूमिकेने प्रेरित झालेले दिसते. मात्र 'पाणकळा', 'सराई' या दिघ्यांच्या कादंबऱ्या ग्रामीण जीवन प्रेरणावर अधिक भर दिलेला दि सतो. ग्रामीण वाङ्‌मयाचा वाचक वर्ग वाढविण्याचे महत्वपूर्ण कार्य ग.ल.ठोकळ व र.वा.दिघे यांनी केले.[9]

1945 ते 50 च्या दरम्यान श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर, यांनी लिहिलेल्या ग्रामीण जीवनावरील कथा, कादंबऱ्या व त्यामध्ये विशिष्ट ग्राम प्रदेशातील वास्तवाची बैठक त्यांच्या साहित्यात दिसते. ग्रामीण जीवनाचा अनुभव त्यांच्या साहित्यातून सामर्थ्याने आकाराला येतो. ग्रामीण जीवनातील समस्या सामुदायिक स्वरूपाने लिहित मोठे ताणतणाव, तिथला निसर्ग व तेथील ग्रामीण जीवनातील ग्रामीण भाषेची घाटणी याचा कसदार अनुभव त्यांच्या साहित्यातून व्यक्त होतो. श्री.म.माटे यांचा दुवा पेंडसे अधिक साधतात. श्रद्धा, जुन्या संस्कृतीविषयीची आपुलकी, माणुसकीविषयीचा दृष्टीकोन, जुने तेच चांगले यासारख्या गोष्टीचा प्रत्यय त्यांच्या वाङ्‌मयातून येतो. या अर्थाने त्यांची साहित्यदृष्टी सृजनशील वाटते. ते जीवनमूल्ये जोपासतात. पण अभिव्यक्तीशी कलात्मक जाणीव त्यांना अधिक असलेली दिसते. ग्रामीण वाङ्‌मयाला खराखुरा प्रारंभ विभावरी शिरुरकरांचा 1950 साली प्रसिद्ध झालेल्या 'बळी' या कादंबरीने केला. अस्पृश्य वर्गाहूनही भयानक जीवन जगणाऱ्या चोरटया जमातीचे चित्रणीकरणात ही

कादंबरी मराठी साहित्यात श्रेष्ठ ठरली पण विभावरी शिरुरकरांनी परंपरा निर्माण होईल असे काही ग्रामीण साहित्य निर्माण केले नाही.[10]

1950 ते 1955 च्या आसपास व्यंकटेश माडगूळकरांनी नव्या चाकोरीतील कथा कादंबरी लिहिली. आगळेच तेज घेऊन जन्माला आलेल्या त्यांच्या साहित्याने ग्रामीण साहित्यात वेगळेच पर्व निर्माण केले यात शंकाच नाही. मर्ढेकरांच्या कलात्मकतेचा समृद्ध वारसा माडगूळकरांना लाभलेला होता. मर्ढेकरांनी नवकवितेबरोबर कलात्मकतेचा समृद्ध विचार मांडल्यामुळे तत्कालीन कथा लेखकांनी विशेषतः नव कथाकारांची विशिष्ट कलात्मक जाणीव समृद्ध झाली. भावे, गाडगीळ, गोखले, माडगुळकर ही नवकथा लिहिणारी मंडळी• माडगूळकरांनी मात्र अत्यंत गांभीर्याने माणदेशाचा परिसर, तिथल्या माणसांच्या गुणवैशिष्ट्यासह मराठी साहित्यात आणला. ते अधिक आत्मनिष्ठेने अनुभव व्यक्त करतात. ग्रामीण जीवनातील रूढी, अज्ञान, समजूती, द्रारिद्रय, जगण्यासाठी त्यांची चाललेली धडपड ते सूक्ष्मपणे रेखाटतात. माणसांच्या बारीकसारीक ताणतणावातून ते माणूस उभा करत असल्यामुळे त्यांच्या कथात विविधता आलेली आहे. माडगूळकरांच्या ग्रामीण साहित्याने नवी परंपरा निर्माण केली.[11]

1950-51 मध्ये आणखी एका लेखकाने ग्रामीण कथा लिहिण्यास सुरुवात केली ते म्हणजे द.मा.मिरासदार होत. द.मा.मिरासदार हे ही ग्रामीण कथा लिहू लागले. मिरासदारापर्यंतची ग्रामीण कथा ही गंभीर स्वरूपाची होती. ती वास्तववादी होती. तिच्यात क्वचित विनोद अधूनमधून डोकावत होता. पण तो विनोद कथेची प्रेरणा म्हणून येत नव्हता. मात्र मिरासदारांनी विनोदी ह्याच एकमेव प्रेरणेने ग्रामीण शुद्ध विनोदी कथा लिहिली. ग्रामीण जीवनातील विसंगती, विरोध, वैचित्र्य, अद्भूतता, माणसांचा जगावेगळेपणा, विक्षिप्तपणा, बढाईखोर प्रवृत्ती, मिस्किलपणा, भित्रटपणा, इरसालपणा, कावेबाजपणा मिरासदारांनी आपल्या कथेचा विषय केला. या वेगवेगळया गुणांना त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वातील अतिशयोक्तीचा उपहास गर्भतेला अती रंजकतेची, उपरोधाची जोड दिली. वरील गुणवैशिष्ट्याभोवतीच त्याची कथा फिरते. त्यामुळे त्यांच्या कथांना मर्यादा पडतात. कधीकधी त्यांच्या कथा ग्रामीण किस्स्याचे स्वरूप धारण करतात. मिरासदारांनी मात्र ग्रामीण कथेला विनोदाचे वेगळे परिमाण देऊन ग्रामीण कथेचा विकास केला हे मात्र निश्चित[12]

याच काळात शंकर पाटील कथा लिहिताना दिसतात. त्यांची गंभीर स्वरूपाची कथा लक्षणीय आहे. माडगूळकरांची कथा माणसे आणि त्यांच्या भोवतालची वास्तवता रेखाटते तर शंकर पाटील यांची कथा मानवी मनाची आंदोलने चित्रित करते. त्यांची कथा मानवी मनाची आंदोलने चित्रित करते. त्यांची कथा मताला प्राधान्य देत असल्यामुळे ती सखोल होते. मानवी मनातील ताणतणाव आणि आंदोलने तिथे सुरू होतात . तेथूनच शंकर पाटील कथेला सुरूवात करतात. नंतर मात्र निवेदनाच्या ओघात ही आंदोलने कशी निर्माण झाली हे सांगतात. त्यांच्या भुजंग, सारवण, कुस्ती या सारख्या कथा वाङ्मयीन दृष्टया श्रेष्ठ आहेत. [13]

वरील लेखक त्रयीच्या काळात म. भा. भोसले, ग.दि.माडगूळकर, सरोजिनी बाबर, इ. लेखक पूर्वीपासून लिहित होतेच. तसेच रणजित देसाई, उद्धव शेळके, आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबा पाटील , नामदेत व्हटकर, हमीद दलवाई, मधू मंगेश कर्णीक , रां.रं. बोराडे, चंद्रकांत भालेराव, डॉ. आनंद यादव, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, सखा कलाल, चारूता सागर इ. लेखक लिहिताना दिसतात . ग्रामीण साहित्य लिहिणारा हा वर्ग बहुजनसमाजातील आहे हे मुद्दाम सांगावेसे वाटते.

डॉ. आनंद यादव, रा.रं. बोराडे यांनीही वास्तववादी जीवन कलात्मकतेने रेखाटले . त्यांच्या लिखाणामागे निर्मळ वास्तवजीवन कलात्मक रेखाटण्याची प्रेरणा दिसते. यादव व बोराडे यांनी बदलत्या ग्रामीण जीवनाची चाहूल आपल्या साहित्यात रेखाटली आहे. यादव व बोराडे यांच्यानंतर स्वातंत्र्योत्तर तिसऱ्या पिढीतील ग्रामीण साहित्यिकानी बदलत्या ग्रामीण वास्तवाचा वेध घेतला. दारिद्र, अज्ञान, बेकारी औद्योगिकरणाचा खेडयावरील परिणाम प्रा. व.बा. बोधे, भास्कर चंदनशिव, उत्तम बावसकर, सुरेश शिंगटे, वामन होवाळ इ. लेखकांनी कलात्मकतेने आपल्या कथेत रेखाटला . ते बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण ही पिढी करताना दिसते.

**ग्रामीण साहित्याचे स्वरूप**

ग्रामीण साहित्याचा विचार करीत असताना ग्रामीण भागामध्ये जवळजवळ 80% लोक रहात असतात. ग्रामीण भागातील राहाणीमानाचा विचार करीत असताना त्यांच्या जीवनपद्धतीचाही विचार ग्रामीण साहित्याच्या स्वरूपामध्ये येतो. ग्रामीण भागामध्ये शेती हाच प्रमुख व्यवसाय होय. या व्यवसायाशी संबंधीत

समाजरचना , बारा बलुतेदार व शेतकरी यांचा अगदी जवळचा संबंध येतो. सर्व जाती लोहार, सुतार, चांभार, कुणबी, न्हावी इ. चे हे नाते जवळचे असते. या सर्वांचे व शेतक-याचे संबंध जवळचे निर्माण झाल्याने त्यांच्या मताची घडणही तशीच आहे. सर्व जातीचे व्यवसाय वेगवेगळे असल्याने सामुहिकताही त्यांच्यात पहावयास मिळते. एकमेकांच्या गरजेसाठी ही बारा बलुतेदार मंडळी कार्य करतात. तसेच अठरापगड जाती या सर्वांच्या एकरूपतेने जीवनव्यवहार चालवतात. त्यामुळे ग्रामीण जीवन परस्परावलंबी झालेले आहे. खेडेगावातील भूमीत जन्मलेले व त्यांच्यातून निर्माण होणारे व संवेदना जोपासणारे मत दिसते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची स्पंदने समाजजीवनाच्या मनावर खोलवर उमटलेली असतात. म्हणून वेगवेगळया लेखकाकडून वेगवेगळया प्रकारचे साहित्य निर्माण झाले. त्यांच्या साहित्यामध्ये समाजजीवनाचे चित्रण दिसते. साहित्यिकाच्या लौकिक जीवनाचा परिणामही त्यांच्या साहित्यात पहावयास मिळतो.

ग्रामीण जीवन हे शेती व्यवसायावर अवलंबून आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतकरी हाच मुख्य असतो. शेतकरी, शेती व्यवसाय, शेती व्यवसायाचा ग्रामीण जीवनावर होणारा प्रभाव, बलुतेदारी, धर्मसंकेत, नितीसंकेत, अंधश्रद्धा, अज्ञान , दारिद्रय असे ग्रामीण जीवनाचे अनेक पैलू पहावयास मिळतात. तसेच ग्रामीण समाजरचना ही वेगळी पहावयास मिळते. ग्रामीण समाजरचना ही विशिष्ट प्रकारची असते. गावामध्ये कोणाचे घर कोठे असावे हे ही ठरलेले असते. गावाच्या मध्यभागी पाटलाचे घर, कुलकर्णींचे वाडे, त्यांच्या शेजारी वाणी, उदमी याशिवाय विशिष्ट जातीधर्माची अनेक घरे एकेठिकाणी म्हणून वाडा असे नांव . मग त्यामध्ये धनगरवाडा, रामोसवाडा, मांगवाडा, चांभारवाडा, शेलारवाडा इ. जमातीची घरे जिथे असतात त्या ठिकाणाला आळी असे ही म्हणत. यामध्येही श्रेष्ठ कनिष्ठ हा भेदभाव असतो.

ग्रामीण भागामध्ये शेतकरी हाच प्रामुख्याने असल्याने त्यांचाच प्रभाव सर्व समाजावर पडलेला असतो कृषिकेंद्रितता हाच ग्रामीण व्यवस्थेचा पाया असतो. बारा बलुतेदार व शेतकरी यांच्यात परस्परपूरकता निर्माण होत असते व त्यातूनच त्यांची जीवनमुल्ये सदैव होत रहातात. श्रेष्ठ कनिष्ठता हा मुख्य भाग मानावा लागतो. यामध्ये महार, मांग, चांभार यांना अस्पृश्य (मागास ) मानले गेले. तसेच जे अल्पसंख्याक किंवा दारिद्रयाने गांजलेले यांचीही काही समाज पिळवणूक करतो. आर्थिक पाठबळ नसल्याने त्यांना या गोष्टींना तोंड द्यावे लागते. ग्रामदेवतेची यात्रा असते.

यात्रेच्यावेळी भंडाऱ्याला एखाद्याला पहिला मान.पाटलाच्या नंतर कुलकर्ण्याचा, परंतु त्यातील अत्यल्प प्रसाद महार, मांग अशासारख्या अस्पृश्यांना मिळेल किंवा नाही हे सांगता येत नाही. कित्येकवेळा अस्पृश्याच्या मुलांना शाळेत एकत्रित बसू दिले जात नाही. ग्रामीण भागामध्ये जातीनिहाय समाजरचना अतिशय पक्की दिसते. काही वेळा रोटी व्यवहार मान्य केला जातो. परंतु बेटी व्यवहार मात्र सर्व गोष्टी पाहूनच केला जातो. व यामुळेच ग्रामीण समाजरचनेत नागर समाजाइतका झटपट बदल झालेला दिसून येत नाही. तसेच त्यांची जातीनिहाय कामाची विभागणीही वेगवेगळी असते.

ग्रामीण भागात गावगाडयाची रचना ही अलुतेदार व बलुतेदार यांची मिळून बनलेली असते. कृषिकेंद्रीत समाजरचनेमध्ये बलुतेदाराला अधिक महत्व आहे. शेतकऱ्याला ज्या ज्या वस्तूची आवश्यकता असते. उदा. लाकडीसाहित्या सुताराकडून , कातडीकाम चांभाराकडून म्हणजेच विविध कामे करून घ्यावी लागतात. व हे काम पारंपारिक स्वरूपाचे असते. वडिलाचा व्यवसाय मुलाने चालवावा हा जणू अलिखित नियमच आहे. महारांनी सांगावा पोहोच करावा. तराळाने दवंडी पिटवावी. इ. प्रकारची कामे ही परंपरागत पद्धतीने चालविली जातात. ग्रामीण भागामध्ये त्यांच्या जातीवरून काही म्हणीही तयार झालेल्या आहेत "ब्राम्हणाघरी लिवणं, कुणब्याघरी दाणं, महाराघरी गाणं" इ. म्हणून या म्हणीवरून पारंपारिक व्यवसाय ओळखले जातात. ग्रामीण भागात आणखी काही जमाती आहेत. यामध्ये घिसाडी, कोल्हाटी, डोंबारी, गोसावी , लमाणी हे काही प्रमाणात करमणुकीची , वैदूकडून वनौषध, घिसाडयाकडून खिळे,-मोळे, कोयते, खुरपी, कुदळी, यांची गरज भागविली जाते. वंशावळी सांगणाऱ्या हेळण्याचाही समावेश फिरस्त्यामध्ये होतो. नंदीवाले, माकडवाले, गारूडी, यांचाही काही अंशी गावगाडयाशी समावेश होतो. सारासार विचार करता सर्व व्यावसायिकाचा येनकेन प्रकारे संबंध येतो.

भारताची संस्कृती ही कृषिप्रधान आहे. शेती-शेतकरी हा ग्रामीण जीवन व्यवस्थेचा पाया मानला जातो. शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने उत्पन्नाबाबतही निश्चितपणे काही सांगता येत नाही. म्हणून तो दैवाकडे झुकतो, व दैववादी बनत असतो. माणसाचे सर्वच जीवन पावसावर अवलंबून असते म्हणून पावसाच्या नक्षत्राना विशेष स्थान आहे. कोणत्या नक्षत्रामध्ये कोणते पीक येते हे त्यांनी ठरविलेले असते व त्यावरच शेतकऱ्याचे भवितव्य ठरते म्हणून ते नक्षत्राना मानतात.

शेतकऱ्यामध्येही मोठा शेतकरी मध्यम शेतकरी व शेतमजूर असे त्यांचेही प्रकार असतात. शेतकऱ्याची शेती जास्त असेल व त्याच्या शेतामध्ये काम करण्यास माणसे नसतील तर तो शेतमजूराकडून कामे करून घेतो. म्हणजेच त्यांना रोजगारांची आवश्यकता असते. भारतीय शेतकरी हा पावसावर अथवा निसर्गावर अवलंबून असतो. त्याची मनोधारणा ही दैववादी दिसते व मग तो निसर्गाची म्हणजेच नारळी पौर्णिमा, गुढीपाडवा, वटपौर्णिमा, कोजागिरी पौर्णिमा, विजयादशमी इ. ची पूजा करतो. व हे सर्व व्यवस्थित झाल्यावर च शेतामध्ये चांगले पीक आले म्हणजे तो दिपावलीचा सण साजरा करतो. शेती करण्यासाठी शेतकऱ्यास प्राण्याची आवश्यकता असते. बैलपोळयाला बैलाची पूजा केली जाते. पूर्वीपासून गायीला पवित्र मानले आहे. म्हणून आजही पवित्र मानले जाते. तसेच पूर्वीच्या काळापासून एक संकेत आहे की शंकराचा म्हणून नंदी. नंदी म्हणजेच बैल . सोमवार हा शंकराचा वार म्हणून सोमवारी बैलास औतास जुंपत नाहीत. शेतकऱ्याच्या रात्री अपरात्री प्रवासात कुत्रा हा सोबतीला असतो. म्हणून कुत्र्याची पूजा, नागपंचमीला नागाची पूजा करतात. कारण नाग हा उंदरांचा नायनाट करतो पाऊस नाही पडत असे दिसताच मेघराजाची आराधना करतात. काही लोक वेगवेगळया प्राण्यापासून आपला उदरनिर्वाह करतात. दुधासाठी गायी, म्हैशी, शेळया, मेंढया यांचा सांभाळ करतात. तसेच धनगर समाज शेळयामेंढया पाळूनच उदरनिर्वाह करतो.

शेतकरी जमिनीवरती मातेसारखी माया करतो. शक्य तितक्या तो प्रामाणिकपणे शेतीची सेवा करतो. वंशपरंपरागताने तो शेतीच्या व्यवसायाशी येणाऱ्या व्यवसायाचीही तो पूजा करतो.

तसेच ग्रामीणतेतील लोकांना दारिद्रयामध्येच दिवस कंठावे लागतात. दारिद्रय हा जणू खेडूताना शापच आहे. जीवनजगण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. त्यामध्येच निसर्गाचा हा लहरीपणा असल्यामुळे त्यांना उत्पन्न निश्चितपणे येत नाही. फक्त जगणं एवढच त्यांना माहीत असते. पोटासाठी भांडणारी माणसं ग्रामीण भागामध्ये पहावयास मिळतात. दारिद्रय जणू त्यांच्या पाचवीलाच पुजलेले असते. मग ती आण्णा भाऊ साठे यांची वारणाकाठची माणसे असोत किंवा शंकरराव खरातानी रेखाटलेली आटपाडी परिसरातील माणसे असोत सर्वाच्या ठिकाणी एकच समस्या ती म्हणजे दारिद्रयाची. व पोटाची भूक भागविण्यासाठी याच्यातूनच ते मार्ग काढत असतात. यावर उपाय म्हणजे चोरी करणे. त्यांच्याकडील उत्पन्नाचे मार्ग बंद झाले की मग ते वरील मार्ग शोधतात मग त्यातून

सुगीच्यावेळी ज्वारीची कणसे चोरणे, भेंडी, गवार, गवत वगैरे माळण्याचीही चोरी करत. झडीच्या दिवसात खाण्यापिण्याची, वैरणीची चोरी करावी लागते असंतुष्ट माण्से याच मार्गाचा अवलंब करतात. यावरून खेडयातील जीवन किती एकरूप झालेले असते हे दिसून येते.

ग्रामीण परिसरामध्ये माणसाचे मन हे संवेदनाशील व श्रद्धाळू बनते. संस्कारातून संस्कृती व संस्कृतीतून मनाची जडणघडण होत असते. त्यातूनच व्यक्तीच्या मनाला आकार येत असतो. व सामाजिक पातळीवंरचे सहयोगी जीवन निर्माण होते. समूहजीवन ग्रामीण परिसराचे वैशिष्टय आहे. ग्रामीण भागामध्ये धर्मसंकेत विशषत्वाने पहावयास मिळतात. ग्रामदेवतेवर विशेषत्वाने भरवसा असतो. मग तो म्हसोबा, बिरोबा, वेताळ, धुळोबा यामधील कोणत्याही देवावर त्यांचा विश्वास असतो. गावामधील तुकाई, लक्ष्मी, कुसाई यासारख्या थळ पांढरीच्या देवतांची पूजा करण्यातही आनंद मानतात. व त्यामुळे या धर्माच्या या विशिष्टत्वाने संपूर्ण गावातून समाज एकसंध असतो.

धर्माचे आचरणही ग्रामीण भागामध्ये असते. परंपरागत आचारविचारांना फाटा ग्रामीण साहित्य द्यायला तयार नसते. ग्रामीण जीवन धर्माला विशेष महत्व देते. नैसर्गिक कर्मे , नवस रीतीरिवाज, बारसं, चौदावं, जन्मल्यापासून तिस-यादिवशी नशीब लिहिणे , पाचवी पुजणे वगैरे विधी ग्रमीण भागात असतात. यांच्यात नितीने मनुष्यजीवन जगण्यासाठी काही बंधने निर्माण केलेली आहेत. ही अलिखित स्वरूपाची बंधने लिखित कायद्यापेक्षा जास्तच चिवट असतात.

खेडयातील समाजजीवना बद्दल डॉ. आनंद यादव म्हणतात." खेडयातील संबंध हे एकपदरी सरळ असतात. कारण समाज लहान असतो. संबंध स्थिर असतात त्यात बदल करणे तेथील मर्यादित समाजात शक्य नसते. याचाच एक परिणाम खेडयातील जीवन हे सामुहिक असते. एक घर दुस-या घराला आतून बाहेरून माहित असते, त्यामुळे एखादी अनैतिक रितीबाह्य गोष्ट करताना नकळत समाजाचा दाब व्यक्तीच्या मनावर येतो.[14]

संकेत हा एक विशेष ग्रामीण भागात पहावयास मिळतो संकेत म्हणजे अनिर्बंध मनाला बंधनात जखडून ठेवणे. यासाठी संकेताची निर्मिती झाली. प्रामुख्याने शपथ हा शब्द ग्रामीण भागामध्ये वापरला जातो. वास्तविक पहाता 'शपथ' या शब्दाला विशेष अर्थ नाही. परंतु एखाद्या घटनेचा अतिरेक होऊ नये म्हणून बंधन निर्माण

व्हावे यासाठी हा शब्दप्रयोग वापरला जातो. अपशकून बाबीचे दर्शन व्हायला नको. अमावस्येला भुतांचा खेळ, भूतबाधेवर उतारा, तिकाटयावर सात धान्याचा दामटा, दृष्ट काढणे इ. अनेक गोष्टींचा समावेश ग्रामीण भागामध्ये पहावयास मिळतो. परंतु यांच्या पाठीमागे शास्त्रशुद्ध कारणमीमांसा उपलब्ध नाही. परंतु वरील संकेत हे ग्रामीणभागामध्ये आढळतात व त्यांचे वागणे ही त्याप्रमाणेच असते.

अंधश्रद्धा अज्ञान संकेत यावर ग्रामीण लोकांचा वाढता विश्वास असतो. कोणताही आजार झाला तरी गंडे-दोरे, ताईत, यांचा वापर करीत बसतात. कष्ट करून वस्तू मिळविण्याऐवजी नवस करून वस्तू मिळविण्याचा प्रयत्न करतात. मनोरचना हे ग्रामीणतेचे वैशिष्टय आहे. कुटुंबाच्या बाबतीत विचार करताना एकत्र कुटुंबाला विशेष महत्व असते. कारण विभक्त कुटुंबातील मनाची प्रवृत्ती एक कल्ली असते. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये साधारणपणे तीन पिढया नांदत असतात. यामध्ये आजोबा- आजी, आई-वडील, काका-काकी, चुलत भावंडे इ. अनेक नाती एकत्रित रहात असतात. शेतीव्यवसायामध्ये माणूस बळाला अधिक किंमत असते. लग्न जमविताना मुलीकडचा किती गोतावळा मोठा आहे याचा विचान केला जातो. पुरूषसत्ताक कुटुंबामध्ये सर्व धनदौलतीवर पुरूषाचाच अधिकार असतो. गृहव्यवस्था स्त्रिकडे असली तरीही सर्व सत्ता ही पुरूषाचीच असते. त्यामुळे तिची हौस ही अपुरीच रहाते. चूल, मूल गृहव्यवस्था व शेतीमध्ये त्यांना अधिक राबविले जाते. सासुरवाशीणीला जाच केला जातो स्त्रीची हौस पुरविली जात नाही कारण तिला दुय्यम स्थान असते.

ग्रामीण भागामध्ये सण, उत्सव, यांना स्थान असते आनंदनिर्मितीसाठी सण, उत्सव साजरे केले जातात. यांचा शेती हाच व्यवसाय असल्याने त्याला अनुसरून सण निर्माण झाले. व्यापारी लोक दिवाळी हा सण मोठया आनंदाने साजरा करतात. शेती व्यवसाय शारिरिक कष्टास निगडित आहे. म्हणून निसर्गाची साथ शेतीतील पिके, सोयीची उपलब्धता यांची मिळून सणाची निर्मिती झाली. चैत्र महिन्यामध्ये पालवी फुटते आणि शेतकऱ्याच्या मनातही आनंदाची पालवी फुटण्यास सुरूवात होते. इथूनच पुढे विवाह सोहळे सुरू होतात. वेगवेगळया देवदेवताच्या यात्रा सुरू होतात. यामध्ये प्रामुख्याने प्रत्येकाच्या कुलदैवताची यात्रा असते. जोतीबा, नाईकबा, सिदोबा यांची यात्रा असते. तसेच ग्रामदेवतेचीही यात्रा चैत्र वेशाख महिन्यात असते. आषाढी व चैत्री अशा वाऱ्याही पंढरपूरच्या विठोबाच्या असतात. श्रावणामध्ये सत्यनारायणाची पूजा , खंडेनवमीला शस्त्राची पूजा, कोजागिरी पौर्णिमा, तसेच चैत्र महिन्यामध्ये धनगराच्या

देवांची यात्रा असते. यांच्या यात्रेमध्ये हुईक (भाकणूक) असते. व यामध्ये वर्षाचे भविष्य सांगितले जाते. जवळ जवळ सर्वच महिन्यामध्ये प्रत्येक महिन्यामध्ये एक एक सण व उत्सव असतो. गणपती उत्सव, मुरळी नाचविणे. याही गोष्टी ग्रामीण भागामध्ये दिसून येतात.

ग्रामीण भागामध्ये लोकांचे मनोरंजन हे वेगवेगळया यात्रेच्या निमित्ताने होते. यात्रेमध्ये तमाशा, स्थनिक एखादे नाटक बसवून लोकांचे मनोरंजन केले जाते. तसेच वेगवेगळे खेळ दांडपट्टा खेळणे, सोंगटया खेळणे, धनगरी ओव्याच्या स्पर्धा इ. होत असतात. उन्हाळयामध्ये दूपारच्या वेळी कोकागीत ही ऐकावयास मिळते. ग्रामीण भागातील लोकांच्या मानवी मनाचे वर्णन करताना डॉ. आनंद यादव म्हणतात " वेगवेगळया भागाच्या (देशाच्या) मानवी समूहाची भोगोलिक परिस्थिती , इतिहास, राहणीमान हे इतर भागाच्या देशाच्या तुलनेने वेगवेगळे असते. त्या ठिकाणच्या मानवी समूहाने विशिष्ट धर्म स्वीकारलेला असतो. त्या धर्मानुसार त्याची जीवनपद्धती त्यांची पूर्वपरंपरा निर्माण झालेली असते. तेथील मानवीसमूह विशिष्ट वंशाचा असतो. तेथील भौगोलिक परिस्थिती ही विशिष्ट स्वरूपाची झालेली असते . या सर्वाचा परिणाम होऊन त्याची संस्कृती समाजरचना व तिचा विकास विशिष्ट पद्धतीने झालेला असतो व तेच मानवी मनाचे कार्य करीत असते. त्यातूनच विशिष्ट जगणे जन्म घेत असते. या विशिष्टतेचाच अविष्कार जेव्हा शब्दाचे रूप घेतो तेव्हाच ते साहित्य हे त्या देशाचे होऊन विशिष्ट रूप धारण करते [15]

ग्रामीण वांङमयाच्या स्वरूपाविषयी विचार करता ग्रामीण भागातील माणसाच्या जीवन जगण्याच्या पद्धती, त्यांच्याठायी असणारे आडाणीपण, अज्ञानीपणा, त्यांना करावे लागणारे कष्ट, त्यांच्या पाठीमागे हात धुवून लागल्यासारखे दारिद्रय, यातून तो सारखा मार्ग काढीत असतो व त्यातूनच त्यांची जीवन जगण्याची चाललेली धडपड त्यामुळे त्याच्या वाटयाला येणारी सुखदुःखे याचे समर्थ चित्रण ग्रामीण वांङमयात केले आहे [16] हे डॉ. आनंद यादव आणि रा. रं. बोराडे यांनी ग्रामीण साहित्य आणि समूहमनासंबंधी विचार दाखविले आहे.

ग्रामीण भागामध्ये लोकमानसही वेगवेगळे असतात. खेडेगावातील कुटुंबरचना , समाजरचना, आणि संकेत या सर्वाच्या वेगळेपणामुळे ग्रामीण कथा आणि नागरी कथा असे भेद निर्माण झाले. कृषिकेंद्रितता जाती धर्म,

आचार, सण, उत्सव, श्रद्धा, धर्मकल्पना, यामधुन ग्रामीण मनोविश्वाची जडणघडण होत असते. यांच्यातील सर्व पारंपारिकतेने लोकमानस निर्माण झाले. शहरात पाणवटे नाहीत. विभक्त कुटुंबपद्धती, उद्योगीकरण, यामुळे शहरातील लोकमानस वेगळे. सर्वच नाटकी, छापील, कृती(हास्य), चौकटीबद्ध कुटुंबपद्धती (नवरा-बायको-दोन: दोन मुले बस्स) यांच्या आशा आकांक्षा वेगळया, बंगला, गाडी इ. आपल्या स्वतःसाठी सर्व सोयींनी युक्त मनाची जडण घडण वेगळीच असते. यांचे जीवन हे घडयाळयाच्या काटयाप्रमाणे बनलेले असते.

वरील बाबींचा विचार केला असता असे दिसते की, ग्रामीण भागात सभोवतालचा भाग, तेथील समाज आचार-विचार, धर्मविचार, परंपरा, नैतिकता, आर्थिक परिस्थिती, त्यांचे अंतर्गत व्यवहार, अल्पसंख्यांकाचे व बहुसंख्यांकाचे संबंध आपल्या गावाविषयीचा असणारा अभिमान, या सर्वच बाबींचा व घटनांचा समन्वय साधला जातो. व हेच ग्रामीण साहित्याचे स्वरुप होय. यानंतर ग्रामीण साहित्यमध्ये वेगवेगळे विचार मांडले गेले व यांची वैचारिक बैठक कशी आहे ते पहावयाचे आहे.

**ग्रामीण साहित्याची वैचारिक बैठक**

साहित्य आणि समाज यांचे संबंध परस्परावलंबी असतात. समाजाच्या स्थिती गतीबरोबर साहित्याचे स्वरुप बदलत जाते. यामुळे साहित्यात समाजाचे रुप पहाण्याचा अनेकांना मोह होतो. मराठी साहित्य हेही याला अपवाद नाही. ग्रामीण मराठी साहित्य हे तर बदलत्या महाराष्ट्रीय समाज जीवनाचे प्रतिबिंब घेऊन आलेले साहित्य आहे. असे आजवरचे मराठी ग्रामीण साहित्य वाचल्यावर सहजपणे लक्षात येते. महाराष्ट्र महोदयाच्या उदयाबरोबर मराठी भाषेत साहित्य निर्मितीला प्रारंभ झाला आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास इ. या संतमंडळींनी महाराष्ट्रीय समाजजीवनात भक्तीचा मोहोदधी निर्माण केला. आणि हा भक्तीच्या डोहात स्थान करणारी मराठी साहित्य निर्मिती म्हणजे मराठी संतकाव्य हे होय. महाराष्ट्रीय समाजजीवनात अस्मिता जागृत करणारे. सिद्ध संत-महंत हे जसे मराठी साहित्याला एक प्रवृत्ती देऊन गेले. त्याबरोबरच महाराष्ट्रीय समाजात स्वातंत्र्याची प्रेरणा जागृत करणाऱ्या शिवरायांच्या उदयानंतर मराठी साहित्याला आणि मराठी भाषेला नवे सामर्थ्य प्राप्त करुन देणारे, पंडित कवी उदयाला आले. आणि मराठी साहित्याला नवी बैठक प्राप्त झाली. पेशवाईत विलासवाद व भोगवाद आला. आणि आद्य मराठी शाहीरी कविता, भक्ती आणि वीररसापासून ढळली व तिला शृंगारिक रुप

प्राप्त झाले. पेशवाई गेली. आंग्लशाही आली. पाश्चात्य विचार आणि संस्कृतीच्या दबावाखाली महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय स्थित्यंतराना वेग आला. यातूनच पाश्चात्य शिक्षणामुळे सामान्य माणसामध्ये आणि सुशिक्षितामध्ये मराठी समाज विभागला गेला. शिकलेल्यांना नोकऱ्या मिळाल्या. न शिकलेल्यांचे शोषण सुरु झाले. शिक्षण प्रसारामध्ये बहुजन समाजातील सुशिक्षित तरुणात स्वतःचे हक्क व जबाबदाऱ्या यांची जाणीव वाढली. बहुजन समाजाचे शोषण थांबविण्याच्या जिद्दीतून महात्मा ज्योतीबा फुले यांच्यासारखा विचारवंत जन्माला आला. त्यांनी 1873 मध्ये 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना' करुन एक सामाजिक परिवर्तनाची चळवळच उभी केली. या चळवळीचे साधन म्हणून त्यांनी जे वैचारिक वाङ्मय निर्माण केले. त्यामुळे या चळवळीला अधिकच वेग आला. स्त्री शुद्रादिकांच्या शिक्षणाप्रमाणेच राष्ट्रीय शिक्षण म्हणून त्यांनी शेतीनिष्ठ शिक्षणाचा विचार मांडला. त्यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ महाराष्ट्रातील ग्रामीण संस्कृतीच्या व्यथा वेदनांचा आराखडाच आहे. यातूनच त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण समाज जीवनाच्या सद्यःस्थितीचे परिवर्तन कसे होऊ शकेल या संबंधीही आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या या विचारातून स्फुर्ती घेऊन अनेक बहुजन समाजातील तरुण बहुजन समाजाच्या व्यथा वेदनांचे चित्र साहित्याव्दारे समाजापुढे मांडताना दिसतात. सत्यशोधकी जलसे, व त्यातून निर्माण झालेले मराठी साहित्य, तसेच लोखंडे, जवळकर, मुकुंदराज पाटील या सत्यशोधकी परंपरेने निर्माण केलेली मराठी कथा, कादंबरी, कविता, नाटक, निबंध, आद्य प्रकारातील साहित्यसंपदा अगदी 1953 पर्यंत निर्माण होत असलेली दिसून येते. अज्ञानी व दरिद्री शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारा आणि आपल्या तीक्ष्ण लेखणीने उच्चवर्णीयांचे बिंग फोडणारे मुकुंदराज पाटलांचे साहित्य हे फुल्यांच्या वैचारिक भुमिकेचे आपत्य आहे. या पाठीमागची वैचारिक बैठक ही खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण साहित्यामध्ये वैचारिक बैठक ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाची अस्मिता जागृत करुन त्यांच्या वेदना विद्रोहाचे साहित्य म्हणजे दलित साहित्य असे जर म्हणता येत असेल तर महात्मा फुले यांनी ग्रामीण समाजाची अस्मिता जागृत करुन त्यांच्या व्यथा वेदनांचे शोषणाचे विद्रोहाचे असे जे साहित्य निर्माण झालेले असेल तेच खरे ग्रामीण साहित्य होऊ शकते.[17]

अशा रितीने मराठी ग्रामीण जीवन आणि त्याच्या परिवर्तनाचा विचार 19 व्या शतकाप्रमाणेच 20 व्या शतकातही उफाळून आला. त्यातून मराठी ग्रामीण साहित्याला आणखी शक्ती प्राप्त झाली. विशेशतः राजकीय

स्वातंत्र्याच्या उद्दिष्ठाने देशातील खेडयापाडयात रहाणाऱ्या बहुसंख्य समाजात राजकीय जागृती होण्याच्या दृष्टीने महात्मा गांधीनी राजकीय नेत्यांना आणि विचारवंताना 'खेडयाकडे चला' अशी हाक दिली तर 'कलकत्ता कॉंग्रेस'व्दारा (1917) राजकीय सुधारणाबरोबरच सामाजिक सुधारणांचाही कॉंग्रेसच्या व्यासपीठावरुन पुरस्कार केला. त्यामुळे महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी चळवळीवर पोसला गेलेल्या महाराष्ट्रातील सामान्य माणूस स्वराज्याच्या चळवळीत उतरला. या चळवळीला गतिमान करताना स्वातंत्र्य सैनिक गनिमी काव्याने ब्रिटिशांशी लढले. महाराष्ट्रात तर मराठी तरुणांनी प्रतिसरकारची स्थापना करुन या चळवळीकडे देशातील सर्वांचे लक्ष वेधविले. अशा या प्रतिसरकारात काम करणाऱ्या तरूण मनाचे भरणपोषण करण्यासाठी व त्यांच्या मनोरंजनासाठी त्यांच्याच जीवनाचे ताणेबाणे घेऊन आलेले ललित साहित्य निर्माण करण्याची आवश्यकता आहे. असे साहित्यिकाच्या लक्षात आले व यातून श्री.म.माटयाच्यासारख्या सामाजिक विचारवंताने ग्रामीण भागातील 'उपेक्षितांचे अंतरंग' रेखाटून ग्रामीण साहित्याचा अंकूर अधिक सतेज बनविला. महाराष्ट्रातील ग्रामीण समाज जीवनाचे ताणेबाणे रेखाटून त्यांच्या परिवर्तनाचे निकोप विचार या ललित साहित्याच्या माध्यमातून कलात्मकरितीने मांडले. असा विचार यानंतरच्या काळात वेगाने पुढे आला व त्यातून व्यंकटेश माडगुळकर, डॉ.आनंद यादव, शंकर पाटील, महादेव मोरे यासारखे वैचारिक बैठक असलेले ललित लेखक मराठी ग्रामीण समाजाची ग्रामीण जाणीव असलेले अनुभूतीचे वेगळेपण असलेले साहित्य निर्माण करु लागले. ते खरेखुरे ग्रामीण साहित्य म्हणून संबोधले जाते.

**ग्रामीण साहित्यातील लोकतत्व**

संपूर्ण जगातील मानवी समुहाचा विचार केला तर प्रत्येक लोकसमूहावर कोणत्या ना कोणत्या धर्माचा प्रभाव पडलेला पहावयास मिळतो. भारतातील संस्कृतीला आजतरी मानाचे स्थान आहे. हिंदुधर्मात मानवतावादापेक्षा भूतदया व जीवदया यांचा प्रभाव अधिक असतो. हे तत्व फक्त मानव जातीपुरते मर्यादित नाही तर सर्व प्राणीमात्रांनाही एका पंक्तीत बसविलेले आहे हे आपणास भगवत्गीतेतून दिसून येते. समदृष्टीची कल्पना ही विश्वातील सर्व प्राणिमात्राला लागू आहे. हे दिसून येते. आपल्या धर्मग्रंथातून ब्रम्हा, विष्णू व महेश, इंद्र, वरुण, लक्ष्मी, गणपती ही हिंदुंची दैवते आहेत. एवढेच नव्हे तर नाग, नंदी, तुळशी, वटवृक्ष यांचीही हिंदू संस्कृतीत पुजा केली जाते. सर्वांहून वेगळया अशा स्वरुपाचे धर्मभावनेचे दर्शन होते. येथे धर्माची कल्पना ही धर्मावर न थांबता

ती समाजधर्मापर्यंत येते. येथे संपूर्ण समाज धर्मासमोर असतो. या धर्मामध्ये वेगळे भेदभाव असतात. आशा आकांक्षा असतात. यातूनच समाजसापेक्ष लोकतत्वाची निर्मिती होते.

काही वेळा भरपूर पाऊस पडल्याने महापूर, वादळे, तसेच पाऊस न पडल्यामुळे दुष्काळ पडणे इ. नैसर्गिक आपत्ती ह्या वारंवार येत असतात. त्यामुळे ग्रामीण लोकांत भयकूल वातावरण निर्माण होते. आपल्या दुबळेपणाची जाणीव होते व स्वतःवरील आत्मविश्वास कमी होतो. आणि मग हे अलौकिक अशा व्यक्तिकडे धाव घेऊ लागते व या सर्वांचा संबंध ते देवदेवतांशी जोडतात. त्यातूनच त्यांच्या मनात लोकमानस तयार होतात. या सर्वांच्या पाठीमागे देवदेवता, पशु-पक्षी, नदया, निसर्ग या साऱ्यांचाच समावेश यामध्ये होऊ लागतो व याचे पूजन लोकमानसाच्या दुबळेपणास सहाय्य करते. आपण एखादे कोणतेही काम करण्यास घेतले तर त्यात विघ्न यावयास नको म्हणून भूताखेताची पूजा करणे. प्रथम प्रथम तरी नरबळी देण्याची प्रथा होती. देवदेवतांना बकरे, कोंबडे, कापले जात होते. हे लोकमानसाचे एक तत्वच आहे. या त्यांच्या लोकमानसावरून लोकधर्माचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे स्वरुप दिसून येते.

प्रथमच्या काळापासून लोकमानस बऱ्याच बाबींचे पूजन करीत आले आहे. हे लोकमानस म्हणजे रविवारचे व्रत करणे, भाऊबीजेला चंद्राला ओवाळणे, सुर्याला दररोज नमस्कार करणे, पौर्णिमेचे व अमावस्येचे व्रत करणे, नदी, विहिर, कुंड यांची पूजा करणे, निसर्गामध्ये जो जो घटक आहे त्याच्याविषयी कृतार्थकतेची भावना असते. यांच्यामध्ये विध्वंसाची शक्ती आहे असे वाटते. म्हणून यांची पूजा करणे. या सर्वांचा विचार करता सण, उत्सव, जत्रा, देवदेवतांचे व्रत, श्रद्धा यांच्यापाठीमागे असतात. आपणास वेदशास्त्र पूर्णपणे माहीत नाही तरीही आपण वरीलप्रमाणे क्रियाकर्म करतो व ते लोकमानस म्हणूनच करतो. अनुष्ठान व तांत्रिक विधी वरील शास्त्रावरच अवलंबून असतात आणि लोकमानस या सिद्धिवर भरोसा ठेवते. ज्याचे ज्ञान नसते तेही पूजनीय वाटते म्हणूनच नवस करतात. एखाद्या झाडावर भूत असते ते झाड तोडीत नाहीत. देवी अंगात येणे, गंडे-दोरे हे रोगावरील उपाय असतात. जादुटोणाही केला जातो. दुःखावर उपाय शोधण्याचे असे अनेक मार्ग हे लोकमानसामध्ये मोडतात.

तसेच मानवी मन हे वेगवेगळया रुपात पंचतत्वाची पूजा करीत असते. पंचतत्व म्हणजे आकाश, जल, वायू, अग्नी व माती हे होत. या बाबींतील कोणत्याना कोणत्या तत्वाचा आधार असतोच अशी त्यांच्या मनाची

धारणा असते. जल हे प्रत्यक्ष जीवन आहे. माती ही त्याची माता आहे. ही पंचतत्वे वेगवेगळी असून त्यांची शक्ती व प्रतीके वेगळी वाटतात. निसर्गातील वड, पिंपळ, तुळस यांचे अभिन्न नाते जोडलेले आहे. मंगल कलसात दारावरील तोरणात आंब्याची पाने लावली जातात. जेवणाच्या व पूजेच्यावेळी केळीचे पान असते. शमीची पाने हे दसऱ्याचे सोने मानतात. संत, साधू, किर्तनकार यांचे विधी पूजनीय वाटतात. तसेच आपल्या मुख्य ग्रंथाचेही वाचन अगदी भाविकतेने केले जाते. यामध्ये ज्ञानेश्वरी, भगवत्‌गीता, पांडवप्रताप, हरिविजय हे ग्रंथ वाचल्याने व ऐकल्याने पुण्य लाभते अशी कल्पना आहे. हीच त्यांची श्रद्धा असते. ग्रामीण जीवन हे कृषीकेंद्रिततेशी निगडीत असल्याने पशुपक्षांचीही ती पूजा करतात. उदा. गाय ही कामधेनू, तेहत्तीस कोटी देवांचे प्रतीक, बैल हा तर महादेवाचा नंदीच त्यांच्याकडून नांगराचे छकडयाचे काम करुन घेतले जाते. दसऱ्याच्या दिवशी शेतीला उपयोगात येणारी सर्व साधने यांची पूजा केली जाते. खुरपे, विळा, कुऱ्हाड इ. शेतीला जी जी म्हणून साधने उपयुक्त आहेत त्यांची पूजा केली जाते. तेच त्यांचा जनसमूहाचा लोकधर्म निर्माण केलेला असतो. त्यालाच ते शास्त्र मानतात. याबाबतचे कोणतेही कार्य राहिले तर ते मनातल्या मनात खजील होतात. आपण काय चुकलो याने त्यांचे मन शासंक होते. त्यांच्या मनात एक प्रकारची भितीच असते. कारण ती त्यांची श्रद्धाच असते. त्यांनी तो आपला लोकधर्मच निर्माण केलेला असतो. त्या लोकधर्माला ते सोडू शकत नाहीत.

आपल्या महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये तर या लोकमानसाला जास्त स्थान असलेले दिसून येते. कारण महाराष्ट्रीय भूमीमध्ये वांशिक दृष्टया वेगवेगळया जमातीचे व वंशाचे लोक रहात असत. कारण महाराष्ट्र देश हा शक व द्रवीड यांचा आहे. त्यांच्यामध्ये नाग, कोळी हे वंश ही एकरुप झाले आहेत. यानंतर हळूहळू वैदिक धर्माची ही वाटचाल सुरु झाली. हे सर्वजण मिळून मिसळून राहिल्याने कालांतराने येथील लोकसंस्कृतीचे स्वरुप बनले. यातूनच रूढी, विधी, देवदेवता यांच्या संख्येत भर पडत गेली. त्याचेच प्रत्यंतर लोकसाहित्यातून येते. त्याच लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे लोकमानसाच्या अविष्काराचा अभ्यास होय. प्रत्येक देशातील समाजाची लोकसंस्कृती व लोकधर्म वेगळे असून व तेथील लोकसमूहच त्याचा आधारस्तंभ असतो. कालमानानुसार जशी प्रगती होत जाते तसतसे समूहाचे परिवर्तन होत असते. परंतु तरीही लोकमानस अलिखित संस्कृतीशी संबंध जोडून असतो. पारंपारिक मन हे पुर्वापार चालत आलेल्या लोकमानसाशी संबंध राखूनच आपली प्रगती करीत असतो. त्याने आपला

कितीही मोठा विकास केला असला तरी तो पूर्वापार चालत आलेल्या आपल्या धोरणाला तो सोडू शकत नाही. म्हणून त्यांच्या लोकसंस्कृतीला एक स्वरुप प्राप्त होते. यातच संस्कृतीचा लोकजीवनाचा व्यापक लोकधर्म अंतर्भूत होत असतो.[18]

वरील संदर्भातच उदाहरण द्यावयाचे झाल्यास 'सटवीचा लिखा'ही लोककथा घेता येईल.

'सटवीचा लिखा' ही खेडेगावातील कथा. दोन गाव कामगारांच्या बाबतीतील आहे. यामध्ये एक पाटील आणि दुसरा येसकर. या दोघांनाही बरेच दिवस मुलबाळ नसते. काही कालांतराने या दोघांनाही मुले होतात. पाटलीणबाईस मुलगी व येसकरीण बाईस मुलगा होतो. सातवीच्या दिवशी सटवी येते. दोन्हीही मुलांच्या कपाळावर भविष्य लिहिते. भविष्य लिहून जाताना येसकराला ती दिसते. तो तिला विचारतो. ती आपली ओळख सांगते व मुलांचे भविष्य सांगते. पाटलाच्या पोरीचे आणि येसकराच्या पोराचे लग्न होणार. हा सर्व वृत्तांत येसकर पाटलाला जाऊन सांगतो. पाटील येसकराच्या मुलाला नाहीसा करण्याचा पुष्कळ प्रयत्न करतो. परंतु ते त्याला शक्य होत नाही. कालांतराने पाटलाच्या मुलीचे व येसकराच्या मुलाचे लग्न होते. म्हणजे सटवीने लिहिलेले चुकत नाही ते तसे घडतेच. असा हा लोकमानस आपणास पहावयास मिळतो. एवढेच नव्हे तर 'सटवीने लिहिलेले कधीही चुकत नाही' अशी म्हण ही (ग्रामीण भागामध्ये) लोकमानसामध्ये वापरली जाते. ही लोकमानसाची अभिरुची ग्रामीण भागामध्ये दिसून येते.

ग्रामीण भागामध्ये अशाप्रकारचे लोकमानस जास्त प्रमाणात पहावयास मिळतात. ग्रामीण भागामध्ये लोकमानसाविषयी अधिक अभिरुची असते. पोथ्या, ग्रंथ यामध्ये वर्णिलेल्या देवदेवता यांच्यावर श्रद्धा असते. या श्रद्धेमुळेच त्यांच्या धर्माला दिशा रहात नाही. म्हणूनच सृष्टीतील प्रत्येक वस्तू ही कोणत्या ना कोणत्या रूपाने सहाय्य करीत असते. म्हणून त्याला एक विशिष्ट महत्व प्राप्त होते. त्याचीच ते पूजा करीत असतात हे आपणास लोकसाहित्यातून पहावयास मिळते. म्हणजेच लोकसाहित्य हा लोकमनाचा अविष्कार आहे.

प्रत्येक व्यक्ती ही वेगवेगळया विचारसरणीने भारलेली असते. ती आपल्या जीवन दृष्टीशी निगडीत असते. परंतु याच्यापाठीमागे त्याचा स्वार्थ असतो. आपल्या जीवनातील ध्येये साध्य करण्यासाठी आपल्या ज्ञानाचा वापर करतात. समाजात वावरतानाही स्वतःविषयी काही अपेक्षा असतात. इतरांसंबंधीही काही अपेक्षा

असतात. या धारणेतूनच लोकसाहित्य निर्माण होते. या साहित्यामध्ये सर्वच गोष्टी खऱ्या सांगितलेल्या नसतात. काही जाती ह्या वाईट व काही जाती ह्या चांगल्या अशी त्यांच्या मनाची धारणा झालेली असते. अशाप्रकारे तरी त्यांच्या साहित्यात का पहावयास मिळते? तर एकमेकाविषयीची असणारी व्देषाची भावना हि व होय. कारण प्रत्येक लोकसमूहाची पुर्वीपासून चालत आलेली एक परंपरा असते. या परंपरेनुसारच लोकसमूह जात असतो. मग यामध्ये काही गोष्टी ह्या समाजाची गरज भागविणेसाठी येत असतात. व एखादी गोष्ट सहज घडत नसेल तर त्यांच्या मनात शंका येत रहाते. हे त्यांचे लोकमानस होय. उदा. पाऊस पाडण्याचे विधी, मंत्राच्या सहाय्याने एखादे काम करणे हे लोकसाहित्यातून दिसून येते. याचे कारण म्हणजे आदिम संस्कृतीत त्यांच्या विचार विश्वाशी संबंधीत काही कर्मकांडात्मक विधी व लोकाचार असतात. याचा मानवी जीवनाच्या सुखासाठी उपयोग होतो असे ते मानतात.

सारांशरुपाने विचार केल्यास लोकसाहित्य हे आदिमकाळापासून चालत आलेले आहे. आज मानवाची खूप प्रगती झालेली आहे. तरीही लोकमानसाची संकल्पना स्वीकारावीच लागते. 'लोकमानस'या संकल्पनेचा विचार करीत असताना डॉ.नागनाथ कोतापल्ले यांनी डॉ.प्रभाकर मांडे यांचे लोकमानसाच्या संकल्पनेबाबत मतच ग्राह्य धरलेले आहे व त्यांनी त्यांची व्याख्याच 'ग्रामीण साहित्यः स्वरुप आणि शोध' या पुस्तकात दिली आहे की, 'भाषा, रुढी आणि मिथ्सू यामुळे विचारशक्ती निमंत्रित होते. तसेच त्यांनी लोकसाहित्याची सुप्त तत्वे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत. सत्य आणि कल्पित असा भेद न करणे, जड व चेतन यामध्ये आत्मा आहे असे कल्पिणे. अंशावर परिणाम केल्याने तो अंश ज्याचा आहे त्याच्यावर परिणाम होईल असे मानणे, विधियुक्त क्रियेने फलप्राप्ती होते असे मानणे या चार बाबी सुप्त मन समजावून घेण्याबाबत सांगितलेल्या आहेत.[19]

वरील सर्व लोकमानसाच्या बाबतीत पाहिले असता ग्रामीण भागातील लोकसमूहाची विशिष्ट अशी मनोरचना तयार झालेली असते. कृषिकेंद्रित समाजरचनेचे निसर्गसन्मुखत्व एकुण जीवनरचनेलाच आकार देणारे असल्यामुळे ग्रामीण माणसाचे असे एक लोकमानस तयार होते. त्यालाच आपण लोकमानस म्हणतो. या लोकमानसावरतीच ग्रामीण भागामध्ये काही तत्वे निर्माण झाली. त्याचप्रमाणे ग्रामीण लोकसमूह जीवन जगत आहेत. हीच ग्रामीण लोकसंस्कृतीतील लोकतत्व म्हणून ओळखली जाऊ लागली. याचबरोबर ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य यांचेही अनुबंध आहेत ते आपणास पहावयाचे आहेत.

**ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य : काही अनुबंध**

ग्रामीण साहित्य म्हणजे काय? त्याची प्रेरणा, त्यातून निर्माण झालेले संकेत, रुढी, परंपरा या बाबी ग्रामीण साहित्यामध्ये येतात. याच अनुरोधाने ग्रामीण भागामध्ये लोकमान्स तयार झालेले आहेत. या लोकमान्साला ग्रामीण भागातील लोक सोडू शकत नाहीत. याचाच विचार लोकसाहित्यामध्ये मांडलेला असतो. लोकसाहित्याचे स्वरुप हे व्यापक आहे. लोकांनीच निर्माण केलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्याबाबत रा.चिं.ढेरे म्हणतात,'लोकसाहित्य ही सर्व बाजूंनी जवळ असते. त्यामुळे समाजाच्या स्थितीगतीशी जिव्हाळयाचा संबंध असतो. लोकसाहित्याचे महत्व लोकनेत्यांनी हेरलेले असते. ते परंपरानिष्ठ, स्थितीशील, परंपरेच्या निष्ठा जोपासण्यासाठी लोकसाहित्याचा लोकमाध्यमाचा वापर करतात' हाच विचार मांडलेला आहे.[20]

लोकसाहित्य म्हणजे काय याबाबत रा.चिं.ढेरे यांचे विचार पाहिलेत, परंतु 'लोकसाहित्य' या शब्दातील लोक याविषयी अनेक मते आहेत. परंतु आदिम समाजामध्ये सर्वच व्यक्ती, घटक, अप्रगत, असंस्कृत, अविकसित लोकसमूह असा अर्थ स्पष्ट होतो. लोकसाहित्यामध्ये समूहमन तयार होण्यासाठी लोक हे समूहाने रहात असतात असे दिसते. त्यांच्यामध्ये समान सौंदर्य व भावना आवश्यक असते. त्यामुळेच लोकसाहित्य हे कलेचे रुप धारण करते. त्या साहित्यातून जीवनाचा अविष्कार, समान सौदर्यभावना, भाषा, तत्वज्ञान, नितीकल्पना या सर्व तत्वामुळे लोक हे समूहाने जवळ आलेले असतात. लोकसाहित्याला लोकवाङ्मय हा शब्दप्रयोग वापरला जातो. या लोकवाङ्मयातून व लोकसाहित्यातून लोकजीवनाचे दर्शन आपल्याला होते. लोकसाहित्याचा अभ्यास हा लोकमानसाच्या अविष्काराचा असतो. या लोकमानसाच्या लोकरुढी, लोकपरंपरा लोकांनी निर्माण केलेले विधी, व्रते, प्राण्यांची पूजा इ.चा असतो. म्हणजेच लोकसाहित्य हे लोकजीवनाच्या सर्व अंगांना आणि अंतरंगाविशेषांना स्पर्श करणारे साहित्य आहे.[21] लोकसाहित्य हे प्रथम लोकगीतातून सुरु झाले. याला लोकवाङ्मय असेही म्हणतात. लोकवाङ्मय हे मौखिक परंपरेने सुरु झालेले आहे. त्यामध्ये लोककथा, लोकगीते, काही कोडी ~~ही~~ येतात. लोकसाहित्यामध्ये प्रामुख्याने लोकगीत हा अविभाज्य घटक आहे. या लोकगीतातून सामुदायिक मानवाची अभिव्यक्तीच पहावयास मिळते.

वरीलप्रकारच्या माहितीवरून असे सिद्ध होते की ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य यांचे अनुबंध अगदी जवळचे आहेत. ग्रामीण भागामध्ये बहुतांशी लोक अशिक्षित असतात. त्याची विशिष्ट अशी संस्कृती ही

लोकसाहित्यामध्ये रूढी, परंपरा, प्रथा, संस्कृती यांच्यारूपाने आलेली आहे. म्हणजेच लोकसाहित्यात परंपरागत लोकजीवनाचा अविष्कार असतो याचे दर्शन आपणाला सर्व बाबीतून म्हणजे घराघरातून, वेगवेगळया भाषेतून दिसून येते. म्हणून ग्रामीण जीवन व लोकसाहित्य यांचे अनुबंध जवळचे आहेत असे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

वरील सर्व विवेचनावरून असे म्हणता येईल की ग्रामीण साहित्य म्हणजे, ग्रामीण संस्कृती आणि त्या संस्कृतीतून घडलेल्या माणसांच्या मनोविश्वाचे आणि जीवनव्यवहाराचे चित्रण करणारे साहित्य होय. त्या साहित्यामध्ये ग्रामीण भागातील व्यक्तिच्या जीवनाची स्पंदने समाजजीवनाच्या मनावर खोल उमटलेली असतात. त्याचे आचार- विचार, परंपरा, नैतिकता, आर्थिक परिस्थिती, त्यांचे अंतर्गत व्यवहार, अल्पसंख्यांकाचे व बहुसंख्यांकाचे संबंध हे ग्रामीण साहित्यामध्ये डॉ.आनंद यादव, शंकर पाटील, माडगूळकर, आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, मधु मंगेश कर्णिक, रा. रं. बोराडे इ. नी आपल्या साहित्यामधून ग्रामीणतेचे वर्णन केलेले पहावयास मिळते. थोडक्यात ग्रामीण जीवनानुभवाचे वास्तवदर्शनही ग्रामीण साहित्यात पहावयास मिळते. त्या वास्तव जीवनानुभवाला सामोरी जाणारी तरूण मने, ग्रामीण जीवन व ग्रामसंस्कृती याचा परिणाम ग्रामीण कवितेवर झाला. असा यावरून निष्कर्ष निघतो.

* * *

## ** संदर्भ टिपा **

## ** प्रकरण दुसरे **


1. नागनाथ कोथापल्ले , "ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध" मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे 30, प्रथमावृत्ती 4 जानेवारी 1985 पृष्ठ क्रमांक 1
2. तत्रैव पृष्ठ क्रमांक 3
3. तत्रैव पृष्ठ क्रमांक 15
4. डॉ. आनंद यादव , "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या" मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे 30, प्रथमावृत्ती एप्रिल 1979 पृष्ठ क्रमांक 63
5. तत्रैव पृष्ठ क्रमांक 63
6. तत्रैव पृष्ठ क्रमांक 62
7. तत्रैव पृष्ठ क्रमांक 63
8. तत्रैव पृष्ठ क्रमांक 64
9. तत्रैव पृष्ठ क्रमांक 66
10. तत्रैव पृष्ठ क्रमांक 67
11. तत्रैव पृष्ठ क्रमांक 68
12. तत्रैव पृष्ठ क्रमांक 69
13. तत्रैव पृष्ठ क्रमांक 69
14. डॉ. आनंद यादव ," ग्रामीण साहित्य आणि वास्तव " मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे 30 प्रथमावृत्ती 1981 पृष्ठ क्रमांक 43
15. तत्रैव पृष्ठ क्रमांक 12 व 13
16. महाराष्ट्र साहित्य पत्रिका पुणे , अंक डिसेंबर 1980 पृष्ठ क्रमांक 108
17. डॉ. अ.वि.एरंडे सत्यशोधक दीन मित्रकार मुकुंदराज पाटील, 'काल आणि कर्तृत्व' पुणे विद्यापीठास सादर केलेला पी. एच्. डी. प्रबंध प्रकरण 1 ले 1989 अप्रकाशित
18. रा.चि.ढेरे 'संतसाहित्य व लोकसाहित्य पुरवणी ' । ऑगस्ट 1981 श्री विद्याप्रकाशन पुणे 30, पृ.क्र. 29
19. डॉ.नागनाथ कोथापल्ले,"ग्रामीण साहित्य :स्वरूप व शोध" उनि. पृष्ठ क्रमांक 12
20. रा.चि. ढेरे , "लोकसाहित्य शोध आणि समीक्षा " श्री विद्या प्रकाशन पुणे 30, प्रथमावृत्ती ऑक्टाबर 1990 पृष्ठ क्रमांक 16
21. तत्रैव पृष्ठ क्रमांक 16


* * *